# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ३६** **दि. २४/०३/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२४/०३/२०२२ गुरूवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.१६ मार्च २०२२ अन्वये मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | काळे दिपमाला मनोज | सोनवणे सुरेखा सुदाम |
| जोहरे प्रिया मधुकर | सोनवणे अश्विन शांताराम | ढेकळे सदाशिव गणपत |
| नेरकर सरीता अनंत | पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | चौधरी मनोज सुरेश | महाजन सुनिल सुपडु |
| खान रूकसाना बी गबलु | भोईटे लताबाई रणजीत | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | पाटील प्रतिभा सुधीर | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील चंद्रशेखर शिवाजी | आहुजा मनोज नारायणदास |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुंडलिक | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | देशमुख सुन्नाबी राजु |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे भारती कैलास | कोल्हे सिंधु विजय | सोनवणे निता मंगलसिंग |
| चौधरी चेतना किशोर | कोल्हे ललीत विजय | सोनवणे विक्रम किसन |
| भंगाळे विष्णू रामदास | बरडे नितीन मनोहर | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| तायडे ज्योती शरद | बेंडाळे उज्वला मोहन | **स्विकृत सदस्य** |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | राणे गायत्री इंद्रजित | कैलास नारायण सोनवणे |
| काळे अमित पांडुरंग | जोशी अनंत हरिश्चंद्र | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| चौधरी मंगला संजय | तायडे सुरेखा नितीन | राजेंद्र नारायण मराठे |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | चव्हाण ज्योती बाळासाहेब | महेश रतन चौधरी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | मराठे जितेंद्र भगवान | |
| भोळे सिमा सुरेश | पाटील रेखा चुडामण | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरीक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त,श्री.शाम गोसावी, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार, नगररचनाकार, श्री.अशोक करवंदे, शहर अभियंता श्री.व्ही.ओ.सोनवणी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य. श्री. मुकुंदा भागवत सोनवणे , सन्मा .सदस्या सौ. अजंनाबाई प्रभाकर सोनवणे , श्री.मयुर चंद्रकांत कापसे , सौ. राखी शामकांत सोनवणे , श्री भगतराम रावलमल बालाणी ,

सौ.कापसे प्रतिभा चंद्रकांत यांचे रजेचे अर्ज प्राप्त झालेले आहेत ते . मा. पिठासिन अधिकारी महोदय यांनी मंजूर केलेले आहेत.

**मा.आयुक्त सो यांनी मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले तसेच मा.मुख्यलेखाधिकारी यांनी मा.उपमहापौर यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले.**

**नगरसचिव :-** सन २०२१-२२ चे सुधारीत व सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक मा.आयुक्त महोदयांना विनंती करतो की त्यांनी मा. महापौर महोदया यांचेकडे सुपुर्द करावे.

**मा.आयुक्त यांनी सन २०२१-२२ चे सुधारीत व सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांचेकडेस सुपुर्द केले.**

**नगरसचिव, विषय क्रं. १ :-** मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/ ११४२/२०२२ दि.०८/०३/२०२२ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर व सन्मा.उपमहापौर आजच्या या विशेष बैठकीसाठी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व सदस्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये मी जळगांव शहर महानगरपालिकेचा आयुक्त या नात्याने चालु आर्थिक वर्ष सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक व पुढील आर्थिक वर्ष म्हणजे सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक सादर करीत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्त यांनी अर्थसंकल्प मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तथापी सध्या आपल्या महानगरपालिकेमध्ये स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे सदरचा अर्थसंकल्प आपण थेट मा.महासभेसमोर सादर करीत आहोत.

आपल्या सर्वांना माहिती असेलच की, मागील दोन वर्षापासुन म्हणजे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीमध्ये संपुर्ण जगभर कोवीड-१९ या महामारीचा संसर्ग झालेला होता. चालु वर्षाच्या सुरुवातीस कोवीडची दुसरी लाट आलेली होती. ती साधारण जुलै-२०२१ मध्ये ओसरली. तथापी, पुन्हा तिसरी लाट जानेवारी-२०२२ मध्ये सुरु झाली मात्र त्याची व्याप्ती पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या तुलनेत मर्यादित राहुन ही तिसरी लाट फेब्रुवारी-२०२२ मध्ये कमी झाली. या दोन्ही लाटांच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या दवाखाना तसेच आरोग्य विभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम करुन नागरिकांना महानगरपालिकेमार्फत आरोग्य सेवा देण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. इतर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही आवश्यकतेप्रमाणे कोवीड संबंधी दिलेली जबाबदारी पार पाडली. याबद्दल हे सर्व कर्मचारी निश्चितच अभिनंदनाला पात्र आहेत.

या सर्व कोविडच्या कालावधीमध्ये मा.महापौर, मा.उपमहापौर तसेच अन्य सर्व पदाधिकारी व सर्व सन्मा.सदस्य यांनीही प्रशासनाला वेळोवेळी सहकार्य केले तसेच मार्गदर्शनही केले. याबद्दल आपणा सर्वांचे मनपुर्वक आभार व्यक्त करतो.

या आर्थिक वर्षामध्ये शासनाच्या धोरणानुसार सार्वत्रिक मोफत लसीकरणास सुरुवात करण्यात आली. शहरामध्ये महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र तसेच काही स्वंयसेवीसंस्था यांनी चालविलेली लसीकरण केंद्र यांच्यामार्फत सुरुवातीस १८ वर्ष वयावरील नागरिकांचे सार्वजनिक लसीकरण हाती घेण्यात आले. या वयोगटामधील आजपर्यंत सुमारे ३,६१,००० हजार नागरिकांना पहिला डोस देण्यात आला असुन हे प्रमाण एकुण पात्र लाभार्थींच्या तुलनेत ९७.४१% इतके आहे. याचप्रमाणे दुसरा डोस घेतलेल्या नागरिकांची संख्या सुमारे २,९६,००० इतकी असुन हे प्रमाण एकुण ८०% इतके आहे. त्याप्रमाणे सुमारे ११,००० नागरिकांना अतिरिक्त दक्षता डोस देण्यात आलेला आहे.

१५ ते १८ या वयोगटातील युवकांपैकी सुमारे २३००० म्हणजे ९४.४१% युवकांना पहिला डोस देण्यात आला असुन दुसरा डोस घेणाऱ्यांची संख्या १४,३०० म्हणजे साधारणपणे ५८% इतकी आहे. आता नुकत्याच १२ ते १८ या वयोगटातील युवकांचेही लसीकरण सुरु करण्यात आले आहे. येणाऱ्या काही दिवसात संपुर्ण पात्र नागरिकांचे १००% लसीकरण पुर्ण करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे.

जळगांव शहर राज्यातील अत्यंत झपाटयाने वाढणारे शहर आहे. त्याबद्दल कुणाच्या मनात शंका नाही. लोकसंख्या वाढीचा वेग व शहराचे नागरीकरण विचारात घेता शहरातील नागरी सुविधांवर दिवसेंदिवस ताण

वाढत राहणार आहे. या दृष्टीकोणातुन जळगांव महानगरपालिकेचे अंदाजपत्रक हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असुन या अंदाजपत्रकाच्या माध्यमातुन लोकांच्या अपेक्षा पुर्ण करण्याचा आपला प्रयत्न असणार आहे. अंदाजपत्रक वास्तववादी, परिपुर्ण, लेखा सिध्दांतानुसार वर्गीकरण व परिणामकारक असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अंदाजपत्रकात तपशिलवार आर्थिक नियोजन आणि पारदर्शक माहिती असणे आवश्यक आहे.

जळगांव शहरातील किंवा जळगांव महानगरपालिकेसमोरील वाढत्या समस्या आणि पायाभुत सुविधेवरचा ताण विचारात घेता त्यावर मात करून उपाययोजना करण्यासाठी मोठया प्रमाणामध्ये येणाऱ्या कालावधी मध्ये निधीची आवश्यकता भासणार आहे.

सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प तयार करतांना उत्पन्नाच्या अतिशय सुक्ष्म बाबींचा विचार करून प्रत्यक्ष प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विचार करुन जमेमध्ये कोणतीही अवाजवी वाढ न दर्शविता उत्पन्न व खर्चांचा अंदाज मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

जळगांव महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न व दायित्व पाहता अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हे मोठे आव्हान महानगरपालिकेवर असुन महसुली उत्पन्नाच्या वसुलीवर भर देऊन ते पुर्ण करावे लागणार आहे. सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प करतांना संपुर्ण विभागांचा कामकाजाचा आढावा, प्रलंबित दायित्व यांचा सविस्तर विचार करण्यात आलेला असुन त्यानुसार पुढील वर्षी नविन कामांसाठी तरतुदी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

चालु आर्थिक वर्षामध्ये शहरातील पथदिवे बदलवुन एलईडी दिवे लावण्याची ई ई सी एल या कंपनी मार्फत चालु असलेली योजना पुर्ण झालेली असुन या अंतर्गत सुमारे १६००० पथदिवे बसविण्यात आले आहे. तसेच त्याची देखभाल आणि दुरूस्तीसुध्दा सदर कंपनीमार्फत करण्यात येत आहे. हे काम पुर्ण झाले असल्यामुळे या आर्थिक वर्षापासुन महानगरपालिकेस या प्रकल्पापोटी दरमहा हप्ता ई ई सी एल कंपनीला परतफेड आपल्याला करावी लागणार आहे. त्यासाठीची आवश्यक ती तरतूद ही अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे. शहरामधील उर्वरीत भागांमधील ज्या पोलवर नाहीत अशा भागात पथदिवे बसविण्याची कामही याच प्रकल्पा अंतर्गत करण्याबाबत सदर कंपनी बरोबर पत्रव्यवहार चालु आहे. याबाबतीमध्ये निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव येणाऱ्या कालावधीमध्ये याबाबतचा प्रस्ताव महासभेसमोर मांडण्यात येईल.

सन २०२२-२३ या आगामी वर्षात अमृत पाणीपुरवठा योजना तसेच भुमिगत गटारी योजना पुर्ण करुन कार्यान्वीत करणे, घनकचरा प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास सुरूवात करणे हे महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करणे महानगरपालिकेला आवश्यक आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत शासनाने तत्वत: मान्यता दिलेल्या १०० कोटी रुपयाच्या प्रकल्पापैकी रक्कम रु.३८.२६ कोटीच्या शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांना नगरविकास विभागाने नुकतीच मान्यता दिलेली असुन आता याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन ही कामे लवकरात लवकर पुर्ण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रस्ते प्रकल्पाचा पहिला टप्पा मार्गी लागलेला असल्यामुळे मा.राज्य शासनाच्या सुचनेनुसार आता दुसऱ्या टप्यात उर्वरीत सुमारे ६२ कोटी रूपयांचा रस्त्यांचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी महानगरपालिकेमार्फत सादर करावा लागणार आहे. त्यासाठी या प्रकल्पाअंतर्गत करावयाच्या कामांचे नियोजन सद्या करण्यात येत आहे.

जिल्हानियोजन समितीच्या माध्यमातुन आदरणीय पालकमंत्र्यांच्या पुढाकाराने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात दिलेल्या निधीमधुन नागरी दलितेत्तर वस्ती, सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान तसेच नागरी दलित वस्ती सुधारणा या योजनांमधुन मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झालेला असुन सन २०२०-२१ च्या तरतुदीमधुन हाती घेण्यात आलेली कामे सध्या प्रगतीपथावर असुन ही कामे चालु आर्थिक वर्षाअखेर पर्यंत पुर्ण करण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

जळगांव शहराच्या विकास योजनेची मुदत सन २०१३ मध्ये संपुष्टात आली असुन त्यामुळे जळगांव शहराचा विकासाचा आराखडा नव्याने करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शहराची सद्यास्थिती जमिनी वापराचा नकाशा हा तयार करणेचे काम अंतिमत: झालेले असुन आता प्रत्यक्ष विकास योजना तयार करण्याच्या कामाला पुढील वर्षात सुरुवात होणे अपेक्षित आहे. यासाठी नगररचनाकार यांची नियुक्ती करण्यासाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. या कामासाठी महानगरपालिकेला आवश्यक ती तरतूद करणे आवश्यक आहे. त्यासाठी या अंदाजपत्रकात एकुण रु.२ कोटीची तरतुद सुचविण्यात आली आहे.

यापुढे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजाबाबत मी सविस्तर भाष्य खालील प्रमाणे आहे.

## सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज

**(रकमा कोटीत)**

| अ.क्र. | तपशिल | सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक | सन २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | ४२२.९३ | २२४.४४ |
| २. | भांडवली जमा | ७२१.६४ | ३०९.९९ |
| ३. | असाधारण देवघेव | ८१.३१ | ३१.४९ |
| ४. | आरंभीची शिल्लक | ६२.३५ | ३०४.३५ |
| ५. | परिवहन | ०.०४ | ०.०४ |
| ६. | पाणीपुरवठा | ४५.८४ | ३४.९७ |
| ७. | मलनिस्सारण | ६.७५ | १.६९ |
| | **एकुण** | **१३४०.८६** | **९०६.९८** |
| १. | महसुली खर्च | ४७९.९४ | २४१.४५ |
| २. | भांडवली खर्च | ७१०.७३ | ३६९.४८ |
| ३. | असाधारण देवघेव | ७६.३२ | ३५.३८ |
| ४. | परिवहन | ० | ० |
| ५. | पाणीपुरवठा | ४५.७५ | ३६.६७ |
| ६. | मलनिस्सारण | ६.७५ | ० |
| ७. | अखेर शिल्लक | २१.३७ | २२४ |
| | **एकुण** | **१३४०.८६** | **९०६.९८** |

## सन २०२२-२३ चे मुळ अर्थ संकल्पीय अंदाज

**(रकमा कोटीत)**

| अ.क्र. | तपशिल | सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक |
|---|---|---|
| १. | महसुली जमा | ३३०.४० |
| २. | भांडवली जमा | ३११ |
| ३. | असाधारण देवघेव | ५७.६८ |
| ४. | आरंभीची शिल्लक | २२३.९४ |
| ५. | परिवहन | ०.०४ |
| ६. | पाणीपुरवठा | ४२.०८ |
| ७. | मलनिस्सारण | ७.३१ |
| | **एकुण** | **९७२.४६** |
| ८. | महसुली खर्च | ३६९.५९ |
| ९. | भांडवली खर्च | ४५९.८३ |
| १०. | असाधारण देवघेव | ७९.५५ |
| ११. | परिवहन | ० |
| १२. | पाणीपुरवठा | ४२.६४ |
| १३. | मलनिस्सारण | ७.३१ |

| | | |
|---|---|---|
| १४. | अखेर शिल्लक | १४.१ |
| | **एकुण** | **९७२.४६** |

आता या अंदाजपत्रकामध्ये ज्या बाबींचा प्रामुख्याने प्रामुख्याने समावेश केलेला आहे . त्याचा संपुर्ण सभागृह आणि उपस्थित सन्मा सदस्यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक वाटते त्याचा थोडासा तपशिलवार आढावा पुढील प्रमाणे आहे.

**१. मालमत्ता कर :-** आपल्याला कल्पना आहे की ज्यावेळेला जकात बंद झाली त्यावेळेला महानगरपालिकेला प्रामुख्याने उत्पन्न हे जकातीपासुन हाते. नगरपालिका असतांना जकात बंद केली . त्याला पर्याय म्हणुन आपल्याकडे एलबीटीचा त्याच्यामध्ये समावेश झाला आणि त्याच्यामध्ये ज्यावेळेला जीएसटी लागु झाला त्यावेळेला सर्व लोकल टॅक्सेस जे आहेत वस्तु आणि सेवा यांचे हे त्याच्यामध्ये मर्ज झाले आणि मग एलबीटी टॅक्स जो आपल्याला मिळत होता आणि त्याच्या पोटी आता आपल्याला जीएसटी पोटी आपल्याला भरपाई अनुदान प्राप्त होत आहे. त्यामुळे आपण जर आता स्वत:च्या उत्पन्नाचा विचार केला तर मालमत्ता करापासुनचे उत्पन्न हे येणाऱ्या काळामध्ये महानगरपालिकेचे स्वत:च्या हक्काच आणि दैनंदिन स्वरूपामध्ये जमा होणारे आणि दरवर्षी वृध्दीगत होणार असे उत्पन्न आहे. त्यामुळे सगळया महानगरपालिका किंवा ज्या नागरी स्वराज्य संस्था आहेत. नगरपंचायती, नगरपालिका यामुळे पुढच्या काळामध्ये मला वाटत मालमत्ता करासाठीच लक्ष केंद्रीत कराव लागणार आहे. त्याचा पाया कसा मजबुत होईल. संपुर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्या सगळ्या कराची वसुली कशी करता येईल आणि मालमत्ता कराची वसुली हे आपल्याला अधिक वसुलीच प्रमाण कस वाढवता येईल. या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.याचा विचार करता मालमत्ता करापासुन सन २०२१-२२ मध्ये रक्कम रु.५५.५७ कोटी इतके सुधारित उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. मागचा काही वर्षाचा जर विचार केला तर कोविड च्या अगोदर आपल्याला साधारत: ३८ ते ४० कोटी यामध्ये असलेले मालमत्ता कराचे उत्पन्न हे कोविडच्या पार्श्वभुमिवर सुध्दा आपल्या चारही प्रभाग समिती कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्न असुन आणि आपल्या नगरसेवकानमुळे हे अपेक्षित उत्पन्न आणि टॅक्स वाढवणे सुध्दा व त्यात आपल्याला यश आलेले आहे साधारणत: आपण जर दोन वर्षामध्ये आपण बघितल तर मागच्या वर्षामध्ये २०-२१ मध्ये आपण हे ४२ कोटींपासुन उत्पन्न वाढवुन ते आपण ५२ कोटींपर्यंत वाढविलेले आहे. यावर्षीसुध्दा कोविड असतांना किंवा आपले हे कर निर्धारणाचे काम सुरू असतांना सुध्दा आपले उत्पन्न आपण हे ५५ कोटी रूपयांपर्यंत घेण्याचे आपले उध्दीष्ट साधारणत: कालपर्यंत आपले उध्दिष्ट ४८ ते ४९ कोटींचे उत्पन्न हे जमा आहे आणि आठवड्याभरामध्ये आपल्याला अजुन ५ ते ६ कोटी रूपयांचे उत्पन्न हे वसुली करण्याचे उध्दीष्ट आपले आहे. मनपाचे आर्थिक वर्षात उत्पन्न वाढविणेसाठी थकीत कराच्या वसुलीसाठी महानगरपालिकेस अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यात असलेले सक्तीच्या वसुलीबाबतचे सर्व अधिकार वापरून कर वसुलीचे प्रमाण वाढविणेबाबत सर्व प्रभाग अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. शहरातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण जे आहेत ते पुर्ण करण्यात आलेले असुन शहरातील मालमत्तांचे वार्षिक भाडे मुल्य निर्धारणांचे काम पुर्ण झाले आहे. त्यामुळे मनपाचे उत्पन्नात साधारणपणे २५ कोटी रूपयांची वाढ होणे अपेक्षित आहे. या अपेक्षित वाढीसह सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता करापासुन ९०.५९ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे.

शहरातील मालमत्ता धारकांना आकारण्यात येणाऱ्या विलंबाबाबतच्या शास्ती म्हणजे (व्याज) मधुन दिलासा मिळण्यासाठी महानगरपालिकेमार्फत यावर्षी दि.१५/११/२०२१ ते दि.२०/०१/२०२२ या कालावधीमध्ये ९०% पासुन ते ५०% पर्यंत सुट देणारी शास्ती अभय योजना राबविण्यात आलेली होती. याचा बऱ्याच थकबाकीदारांनी लाभ घेतला आहे. यामुळे महानगरपालिकेच्या वसुलीवर सुध्दा सकारात्मक परिणाम झालेला आहे असा आपल्याला दिसुन येतो. याला मिळणारा प्रतिसाद विचारात घेवुन तसेच आदरणिय मा.महापौर यांच्या विशेष सुचनेनुसार दि.१४/०३/२०२२ ते दि.३१/०३/२०२२ अखेरीपर्यंत ५०% सुट देणारी शास्ती नव्याने

अभय योजना आपण सुरू केलेली आहे. या नव्याने राबविण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यात सुध्दा ५०% सुट देणारी आपण योजना राबवित आहोत. माझी सर्व सन्मा.सदस्यांना या निमित्ताने विनंती आहे की आपण आपल्या प्रभागामधील नागरीकांना या योजनेची जास्तीत जास्त माहिती देवुन ३१ मार्च पुर्वी आपण थकबाकीची रक्कम भरून त्यांना मिळणाऱ्या सवलतीचा जास्तीत जास्त फायदा मिळणेबाबत आपण अवगत करावे. तसेच चालु वर्षामध्ये खुला भुखंड कराच्या अभिलेख्यांचे संगणकीकरण करण्यात आलेले असुन त्यानुसार खुला भुखंड कराची देयके निर्गमीत करण्यात आलेली आहे. तसेच खुला भुखंड धारकांना सध्या १००% शास्ती माफीची अभय योजना जाहिर करण्यात आली आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत आपण गेल्या कित्येक वर्षांपासुन पाहतोय की महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करीत आहोत पण हे करत असतांना जळगांवकर नागरीकांवर कुठल्याही वाढीव कराचा बोझा टाकु नये. विशेष करून गेल्या २०२० पासुनची कोविडची परिस्थिती विचारात घेता या दृष्टीने आपण जास्तीत जास्त नागरीकांना दिलासा कसा देता येईल आपणास संपुर्ण सभागृहाची व महापालिकेची जी भुमिका आहे याला अनुसरून या वर्षी म्हणजे पुढील आर्थिक वर्षी आपल्याकडुन आकारण्यात येणाऱ्या मालमत्तेवरील कोणत्याही करांमध्ये वाढ प्रस्तावित करण्यात आलेली नाही. मला वाटत मालमत्ता करा व्यतिरीक्त आपण जळगांव महानगरपालिकेचा विचार करायच म्हंटल तर आपले जे दुकाने , मार्केटस आहेत. त्याच्यापासुन मिळणारे उत्पन्न हा एक आपला प्रमुख उत्पन्नाचा मार्ग आहे.

**२. दुकाने / गाळाभाडे :-** मनपा मालकीच्या एकुण २७ व्यापारी संकुलांमधील एकुण ४६९१ गाळयांपैकी साधारणपणे २३ व्यापारी संकुला मधील २६०८ इतक्या गाळयांची मुदत साधारणपणे सन २०११-१२ तसेच किंवा त्यानंतरच्या कालावधीमध्ये संपलेली आहे. मुदत संपलेल्या गाळयांच्या बाबतीत, मागील कालावधीमध्ये विविध न्यायालयांचे झालेले निर्णय, राज्य शासनाकडुन वेळोवेळी देण्यात आलेले आदेश, तसेच अधिनियमातील कलम ७९ मध्ये सन २०१८ मध्ये करण्यात आलेली सुधारणा तसेच या कलमाअंतर्गत राज्य शासनाने बनविलेले "महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम,२०१९" या सर्वांचा विचार करून या गाळयांचा पुढील कालावधीसाठी करावयाच्या नुतनीकरण / हस्तांतरणाबाबत मा.महासभेने ठराव क्र.४५८ दिनांक :१२/०५/२०२१ पारीत केला असुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. यास अनुसरुन अधिनियमातील तरतुदीनुसार मुदत संपलेल्या सर्व गाळयांची डिसेंबर २०२१ अखेरपर्यंत ही रक्कम कालावधीसाठीची नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करण्यात आली असुन त्याबाबत संबधितांना अंतिम आदेश बजावण्यात आले आहेत. ही थकबाकीची रक्कम वसुली वजा जाता सुमारे १९० कोटी इतकी आहे. तथापी या ठरावाच्या कार्यवाही नुकतीच मा.मंत्री, नगरविकास विभाग यांनी पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे. यास अनुसरुन सर्व सविस्तर अहवाल फेब्रुवारी-२०२२ मध्ये राज्य शासनास सादर करण्यात आला असुन सदरची स्थगिती त्वरीत उठविण्याची विनंती शासनास करण्यात आलेली आहे.

या दुकानांच्या बाबतीमध्ये राज्य शासनाकडुन निर्णय प्राप्त करून घेवुन महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नापैकी व्यापारी संकुलातील गाळयांपासुन मिळणारे उत्पन्न ही प्रमुख बाब असुन यावरच महानगरपालिकेची पुढची आर्थिक स्थिती अवलंबुन राहणार आहे. हे मी सन्मा सभागृहाच्या निदर्शनास आणुन देत आहे. गेल्या साधारणपणे १० वर्षापासुन हा विषय प्रलंबीत असल्यामुळे मुदत संपलेल्या गाळयांची नुकसान भरपाईची रक्कम मोठया प्रमाणात येणे असुन ती वसुली करण्याच्या संदर्भात महानगरपालिकेस विशेष लक्ष देऊन त्वरीत कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**३. नगररचना विभाग :-** तिसरा उत्पन्नाचा स्त्रोत म्हंटला म्हणजे नगररचना विभाग असुन सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात नगररचना विभागासाठी रक्कम रु.२४.१० कोटी इतके सुधारित उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले असुन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात २२.१० कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे. शासनाने एकत्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली जाहीर केलेली असुन त्यानुसार अनुज्ञेय एफ एस आय मध्ये वाढ करण्यात

आली आहे. तसेच छोटया भुखंडावरील बांधकाम परवानगीची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आलेली आहे. सुधारीत नियमावलीमुळे शहरामध्ये येणाऱ्या गृह प्रकल्पांना अधिक चालना मिळुन नागरिकांना किफायतशिर किमंतींमध्ये घरे उपलब्ध होण्याचे प्रमाण वाढणार आहे. तसेच या सर्व प्रक्रियेमुळे महानगरपालिकेत सुध्दा या विभागापासुन मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे. २०२०-२१ आणि २१-२२ या वर्षांचा जर विचार केला तर सुधारीत नियमानुसार याबाबत मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होणार आहे.

**४. पाणीपुरवठा :-** पाणीपुरवठाचे सद्या अमृत योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेला २५३ कोटी रुपयांची आपल्याला पाणी पुरवठाची जी योजना मंजुर झालेली आहे. त्याच्यामध्ये आपण सुधारीत प्रकल्प आढावा तयार करून २५३ कोटी रूपयांमध्ये आपण वाढ न करता आपण जो प्रस्ताव सादर केला होता साधारणत: २०१६-१७ मध्ये शहरामध्ये आलेल्या बऱ्याचश्या कॉलनी किंवा एरीयामध्ये पाईपलाईनचा त्याच्यामध्ये समावेश नव्हता. त्यामुळे बऱ्याचशा तक्रारी आपल्याला महानगरपालिकेच्या सर्व सन्मा.सदस्यांना व लोकप्रतिनिधींना प्राप्त होत होत्या की आमच्या भागामध्ये अमृतच्या योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे आपण याच्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेवुन अशा एका संस्थेमार्फत संपुर्ण शहराचा पुन्हा सर्वे करून ज्या-ज्या कॉलन्यांमध्ये अमृत योजनेमध्ये पाईपलाईन समाविष्ट करण्यात आलेली नव्हती . असा जवळपास १६८ किलोमिटर लांबीचा नव्याने प्रस्ताव आपण सुधारीत पाणी पुरवठा योजनेचा याच्यात समावेश केले असुन मा.महासभेमार्फत आपण तो राज्य शासनाला सादर केला आणि मला या ठिकाणी सांगायला आनंद वाटतो की आपल्या जिल्हयाचे आदरणिय पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या विशेष प्रयत्नामुळे महाराष्ट्र जिवन प्राधिकारणाने आपल्याला या योजनेमध्ये १६८ किलोमिटर लांबीचा समावेश केला आणि त्याला नगरविकास खात्याकडुन सुधारीत मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे आता शहरामधील सर्व वस्त्यांमध्ये व सर्व कॉलनींमध्ये आता आपल्याला अमृतची पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेता येणार आहे. असे असले तरी सुध्दा आपली जी मुळ पाणी पुरवठा योजना आहे. त्याच्यामध्ये आपल्याला साधारणत: ५९५ किलोमिटर लांबीची पाणी पुरवठा पाईपलाईन आणि ७ पाण्याच्या टाक्या आणि आपला जो उमाळयाचा जलसुध्दीकरण प्रकल्प आहे. त्याच्यामध्ये काही ऑटोमेशन आणि सुधारणा अशा प्रकारची जी मुळ काम आहेत. ही कामे आपली आता पुर्णत्वास आलेली आहेत आणि मला खात्री आहे की पुढच्या दोन महिन्याच्या कालावधी मध्ये हा प्रकल्प आपला पुर्ण होईल . आजच्या सभेत सुध्दा आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना याची कल्पना आहे की हे जसे जसे पुर्ण होत आहे. तसे तसे आपण त्या ठिकाणचे काम पुर्ण करू. व त्या भागामध्ये आपण अमृत योजनेचा पाणी पुरवठा करण्याचा आपण पुर्णपणे प्रयत्न करतोय. पुढच्या दोन महिन्यामध्ये साधारणपणे शहरामधल्या बऱ्याचशा भागामध्ये अमृतचा पाणीपुरवठा करण्याकरीता आपल्याला यश येईल अशी मला खात्री आहे. उर्वरीत १६८ किमी चे जे काम आहे. ते सुध्दा आपले पावसाळ्या पुर्वी पुर्णपणे करण्याचे आपलं उद्दीष्ट आहे आणि मला अस वाटत की साधारणत: पुढच्या तिन महिन्याच्या कालावधीमध्ये हा दुसरा टप्पा सुध्दा आपण पुर्ण करू शकु, नविन आकारणी पासुन सन २०२१-२२ या वर्षासाठी रक्कम रु.३४.९७ कोटी इतके सुधारित उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले असुन सन २०२२-२३ या वर्षामध्ये रक्कम रु.४२.०८ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे. नजिकच्या काळात सध्या सुरु असलेले अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण होणार आहे. जुन्या पाणी पुरवठा वाहिन्यांवरील नळ कनेक्शन नविन पाईपलाईनवर जोडुन देण्यात येत आहेत. जे कनेक्शन अधिकृत आहेत तसेच कनेक्शन नविन पाईपलाईनवर जोडुन देण्यात येत असल्यामुळे अनधिकृत नळ कनेक्शन बंद होणार आहे. त्यामुळे यापासुन होणारे मनपाचे नुकसान टळणार आहे. महानगरपालिकेला नविन नळ कनेक्शन पासुन आपल्याला अधिक उत्पन्न मिळणार आहे. तसेच अनाधिकृत नळ कनेक्शन असणाऱ्यांना महानगरपालिकेकडे रितसर मागणी करुन नविन नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे अधिकृत कनेक्शनची संख्या वाढुन पाणीपट्टी पासुन मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे.

**५. मलनिस्सारण :-** सन २०२२-२३ या वर्षाच्या पहिल्या सहामाहित भुयारी गटार योजनेचे काम पुर्ण होणे अपेक्षित असुन या अंतर्गत मलप्रक्रिया प्रकल्प (STP) कार्यान्वीत होईल. त्याचप्रमाणे (STP) कार्यान्वीत झाल्यानंतर प्रत्येक घराचे शौचालय व सांडपाणी कनेक्शन हे या योजनेच्या प्रापॅटी चेंबरला जोडण्यात येणार आहे. मलनिस्सारण योजना कार्यान्वीत झाल्यानंतर या योजनेच्या कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्ती या खर्चासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार मलप्रवाह कर लागु करणे आवश्यक आहे. तसेच नागरीकांना परवानगी देत असतांना या कराची आकारणी आपल्याला करावी लागणार आहे. मलप्रवाह कर आकारणी करणे व जोडणी शुल्क आकारणी करणे या साठीचा स्वतंत्र प्रस्ताव योग्य वेळी महासभेसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

**६. घरकुल :-** गेंदालाल मिल, शिवाजी नगर, वाल्मीक नगर, खेडी, पिंप्राळा जुने व नविन घरकुले महानगरपालिकेने बांधकाम करुन घरकुल योजना राबवुन बांधकाम करून संबंधित नागरीकांना त्याचे हस्तांतरण करण्यात आलेले आहे. त्यावेळेला नगरपालिकेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रत्येक घरकुल धारकांकडुन सर्व सोई सुविधा पुरविणेकामी त्यांचे मार्फत दररोज रु.५ याप्रमाणे सेवाशुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. परंतु या बाबतीत जे करार झालेले असले तरी सुमारे २० वर्षाचा जर आपण अनुभव बघितला सदर रक्कम घरकुल धारक भरणा करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सेवाशुल्काची साधारणपणे थकबाकी १६ कोटी रूपये इतकी आहे. सदर थकबाकी वसुलीसाठी महानगरपालिकेस परिणामकारक उपाययोजनेचा अवलंब करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी सदर वसुलीची जबाबदारी संबंधीत प्रभाग समिती कार्यालयाकडे सोपविण्यात आलेली आहे. यासाठी अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करुन देवुन वसुलीच्या कामाला गती देणे आवश्यक आहे. याबरोबरच या सभागृहातील ज्येष्ठ सदस्यांनी या घरकुलच्या वसुली साठी अन्य काही मार्गाचा वापर करता येईल का यादृष्टीने काही सुचना प्रशासनाला केलेल्या आहेत. प्रशासनामार्फत त्याच्यावर विचार विनिमय चालु आहे आणि त्याची व्यवहार्हता तपासुन आपल्याला याबद्दल सुध्दा महासभेसमोर एक धोरणात्मक प्रस्ताव देवुन त्याच्यावर निर्णय घेणे आवश्यक आहे. जेणेकरून हा घरकुलच्या वसुलीचा प्रश्न हा महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातुन कायमस्वरूपी आपल्याला निकाली काढता येईल.

**७. विविध शुल्क आकारणी :-**महानगरपालिकेमार्फत प्रभाग स्तरावरुन नागरिकांना वेगवेगळे दाखले / उतारे देणे तसेच मिळकत हस्तांतरण इत्यादी सेवा देण्यात येतात. यासाठी आपण मागच्या वर्षी वाढ केलेली आहे . आकारण्यात येणाऱ्या सेवाशुल्का मध्ये वाढ सुचविण्यात येत असुन त्याबाबतचा तपशिल अंदाजपत्रकासोबत सादर केलेले आहे.

**८. सर्वांसाठी घर योजना :-** सन्मा. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सर्वांसाठी घरे या योजनेतुन जळगांव महानगरपालिकेला राज्य शासनामार्फत १८,००० घरकुले बांधुन पुर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवुन देण्यात आलेले आहे. या योजनेमुळे झोपडपट्टीच्या जागेचा विकास होवुन झोपडपट्टीचे निर्मुलन होईल. तथापी नागरिकांचे आरोग्य सुधारेल, तथापि, या योजना अंतर्गत मंजुर वैयक्तिक मालकीच्या जागेवरील घर बांधणे कार्यक्रमास अधिक गती देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पुढील वर्षामध्ये उपाययोजना करण्यात येईल. याच्यासाठी मागील वर्षाप्रमाणे स्वतंत्र कक्ष स्थापन करून यासाठी जे काही राज्य शासनाकडुन कर्मचारी नियुक्त केलेले असतात तरी सुध्दा महानगरपालिकेच्या स्वखर्चाने त्याठिकाणी काही तांत्रिक कर्मचारी या नागरीकांना पाठपुरावा करून जास्तीत जास्त फायदा करून देण्यासाठी नियुक्त्या करण्यात येत आहेत. तसेच महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या जागेंवर बांधकाम करण्याचा प्रकल्प कसा राबविता येईल याच्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत दुसरा जो घटक आहे तो किफायतशीर घरे हा आपण म्हणजे रोहाऊसेस स्किम याच्याकरीता आपण मेहरूण आणि पिंप्राळा या दोन ठिकाणी आपण महानगरपालिकेच्या भुखंडावर आपण बीओटी तत्वावर अशा प्रकारची घरकुल योजना किंवा पंतप्रधान आवास योजनेच्या अंतर्गत राबविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. परंतू या योजनेकरीता त्यावेळेच्या अटी व शर्तीचा विचार करता नागरीकांकडुन पाहीजे तसा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये सुध्दा या दोन भुखंडावर अफॉर्डेबल स्किम राबविण्याच्या योजनेमध्ये एकतर हे भुखंड म्हाडा करीता उपलब्ध करून देणे त्याची किंमत महानगरपालिकेने घेणे व स्किम राबविणे किंवा आपल्या अटी शर्तींमध्ये आपल्याला तसा फेरबदल करून महानगरपालिकेच्या स्तरावर आपण याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी सुध्दा

नजिकच्या काळामध्ये सर्व सन्मा. पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्याचा एक सर्वसमावेशक प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी महासभेसमोर सादर करण्यात येईल.

**९. घनकचरा व्यवस्थापन :-** महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासनाच्या अनुदान योजने अंतर्गत रक्कम रु.४९ कोटी रूपयांचा सुधारीत घनकचरा प्रकल्प मंजुर झालेला आहे. या अंतर्गत सध्या आव्हाने शिवार येथील कचरा डेपोवरील पुर्वीच्या कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया पुर्ण करून काही प्रमाणात जागा कचरामुक्त करण्यात आलेला आहे. तथापि, अद्यापही तेथे कचरा प्रक्रियेअभावी तेथे प्रक्रीया करण्यासाठी पडलेला आहे. उर्वरित कचऱ्यावर हा सुधारीत प्रकल्प झाल्यावर या कचऱ्यावर प्रक्रिया पुर्ण होवुन त्यासाठी अडकलेली जागा मोकळी करून त्याच जागेवर नव्याने येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्पाचे काम सुरु करणे आपल्याला या विषयामध्ये आवश्यक असणार आहे.

**१०. समाज विकास विभाग :-** शहराचा सर्वांगीण विकास करीत असतांना आपल्याला शहरामध्ये जे काही उपस्थित घटक आहेत. आर्थिक दृष्टया जे दुर्बल घटक आहेत किंवा विशेष घटक ज्यांना आपण प्राधान्य देतो . अशा घटकांसाठी विकास कार्यक्रम असतील किंवा विकास योजना असतील. यामध्ये सुध्दा गेल्या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेने मोठा निर्णय घेतलेला आहे. महिला बालकल्याण विभाग यासाठी सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु.२.०० कोटी इतकी तरतुद सुचविण्यात आली असुन महिला बालकल्याण विभागामार्फत शिक्षिका मदतनिस यांच मानधन देणे, विद्यार्थ्यांना पोषण आहार, शिष्यवृत्ती, पुस्तक वाटप करणे त्याच प्रमाणे महिलांची वैद्यकिय तपासणी करणे त्यांना विविध विषयांचे प्रशिक्षण देणे, महिला महोत्सव साजरा करणे इत्यादी कार्यक्रम हाती घेवुन महिला व बालकल्याण विभागासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतुद खर्च करणेबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच दिव्यांग कल्याण योजनांसाठी रूपये २.०० कोटी इतकी तरतुद पुढच्या वर्षी सुचविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शहरातील आर्थिक व दुर्बल घटकातील नागरीकांसाठी स्वतंत्रपणे रु.२.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. मी आता म्हंटल्याप्रमाणे चालु आर्थिक वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या एकुण १५ योजनांना तसेच दिव्यांग कल्याण योजना अंतर्गत एकुण ११ योजनांना महासभेने मान्यता दिली असुन या सर्व योजनांची चालु आर्थिक वर्षापासुन अंमलबजावणी करण्यात येत आहे. महिला व बालकल्याण, दिव्यांग कल्याण तसेच आर्थिक व दुर्बल घटक यासाठी आवश्यकतेप्रमाणे मागील वर्षामधील अखर्चीत तरतुद उपलब्ध करून देण्यास पुढील कालावधीमध्ये जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटीबध्द असणार आहे. महानगरपालिकेच संपुर्ण कामकाज या शहरातील नागरीकांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.

आपण महानगरपालिकेच्या प्रशासनामार्फत या संपुर्ण महानगरपालिकेचे कामकाज राबवत असतांना यामध्ये महानगरपालिकेमध्ये जे सेवक वर्ग आहेत अधिकारी आणि कर्मचारी हा अत्यंत असा आपल्याकडील महत्वाचा एक घटक आहे. मा.महासभेमार्फत अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठीचे वेगवेगळे निर्णय आणि हाती घेतलेले विकास कामं ही नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी आपल्याला या कर्मचाऱ्यांची उपयुक्तता ही निर्विवाद आहे. अशावेळेला आपण काही वर्षांपासुन पाहत आहोत की आपल्याकडील महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची संख्या ही कमी होतांना दिसतेय . आता याची भरती करण्यासाठी आपल्या महानगरपालिकेसमोर जी आपली भरती होती ती महानगरपालिका २००३ ला स्थापन झाल्यानंतर आपल्या महानगरपालिकेचे एक स्वतंत्र आस्थापनेचा आराखडा , सुचिबध्द हा आपण तयार केलेला नव्हता. साधारणत: २०१७-१८ ला या कामाला सुरूवात झाली  आणि पहिला आकृतीबंध हा २०१९ मध्ये मा.महासभेच्या मान्यतेने आपण राज्य शासनाला सादर केलेला होता. तथापी त्याच्यामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यानंतर राज्य शासनाने आपल्याला त्याच्यामध्ये सुधारणा करून नव्याने अर्थसंकल्प तयार करण्याच्या दृष्टीने नव्याने आकृतीबंध तयार करण्याच्या सुचना आपल्याला देण्यात आलेल्या होत्या . त्याला अनुसरुन २०२१ मध्ये साधारणत: अग्निशामकासह सुमारे २१०० पदांचा संपुर्ण महानगरपालिकेच्या सर्व जागांचा विचार करून एक सुधारीत आकृतीबंध आपण राज्य शासनाला मान्यतेसाठी सादर केलेला आहे. याच्यावरील सविस्तर चर्चा ही मा.महासभेमध्ये याला मंजुरी देण्यात आलेली आहे. आता सद्या हा आकृतीबंध राज्य शासनाच्या स्तरावर तपासणीच्या प्रक्रीयेमध्ये आहे आणि आपण सर्व सन्मा. सदस्य व पदाधिकारी यांच्या मार्फत आपण हा आकृतीबंध लवकरात लवकर राज्य शासनाकडुन मंजुर करून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर आता जी आपल्याला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची उणिव भासते आहे ती आतापर्यंत आपली खर्चाची मर्यादा पाळुन

आपल्याला अधिकाधिक पुढच्या काळामध्ये कर्मचारी भरती करून आपल्याला ही अधिकारी व कर्मचाऱ्यांची अपुर्ण असलेली संख्या आपल्याला पुर्ण करता येईल. जेणेकरून महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ज्या सगळया प्रशासकीय योजना आहेत त्या अधिक गतीने आणि कार्यक्षमतेने आपल्याला राबविता येतील. याच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संदर्भामधील एक दुसरा महत्वाचा विषय जो मागील काही अनेक दिवसांपासुन आपल्याकडे सतत मागणी येते सन्मा.सदस्यांच्या सुध्दा याच्यामध्ये सतत काही सुचना असतात. आदरणिय महापौर , उपमहापौर आणि सर्व गटनेते यांनी वेळोवेळीस या संदर्भामध्ये प्रशासनाला तशा सुचना केलेल्या आहेत आणि त्याचा पाठपुरावा केलेला आहे आणि तो अत्यंत जिव्हाळयाचा विषय म्हणजे ७ वा वेतन आयोग लागू करणे - मा.महासभेने हा १५ नोव्हेंबर २०१९ रोजी हा महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव हा धोरणात्मक निर्णय घेवुन राज्य शासनाला सादर केला होता. यानंतर वेळोवेळीस महानगरपालिकेला राज्य शासनाकडुन महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत माहिती घेतली. याच्यामध्ये भविष्यामध्ये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कशी राहणार आहे. याबाबतीत महानगरपालिकेकडुन काही प्रस्ताव पाठवले आणि या सगळयांचा एकत्रित विचार करून जुन २०२१ मध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना हा वेतन आयोग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या आयोगाच्या धर्तीवर लागु करण्याला राज्य शासनाने तत्वत: मान्यता दिलेली होती. मात्र हा ७ वा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भामध्ये प्रशासनाला राज्य शासनाने काही अटी घालुन दिलेल्या होत्या. पुढील काळामध्ये यात ज्या अटी होत्या याच्यामध्ये जर प्रामुख्याने विचार केला तर ज्या कालावधी मध्ये हा प्रस्ताव पाठविला आणि तो मंजुर झाला तर तो पुढील काळामध्ये राज्य शासनापासुन केंद्र शासना पासुन ते अगदी ग्रामपंचायत पर्यंत या बाबतीत सर्व शासकीय पातळीवर जे आर्थिक संचय होती ती राज्य शासनाने जी एक आर्थिक बाब प्रामुख्याने नमुद केलेली होती की कोविडची परिस्थिती विचारात घेता महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम विचारात घेवुन आता कोविड स्थितीतुन बाहेर आल्यानंतर किंवा कोविड स्थितीचा परिणाम हा येणाऱ्या काळामध्ये महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर पुढच्या काळामध्ये होणार नाही. याची खातरजमा प्रशासनाने करावी आणि त्याच्यानंतर हा ७ वा वेतन लागू करावा. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दीमधील जेवढ्या मालमत्ता आहेत त्या संपुर्ण मालमत्तांचे GIS पध्दतीने सर्वेक्षण कराव व त्यांचे पुन्हा पुर्नमुल्यांकन कराव आणि हे पुर्नमुल्यांकन करून शहरातील १०० टक्के मालमत्ता या मालमत्ता कराच्या कक्षेत येतील हे बघाव आणि अर्थातच म्हणजे प्रत्येक महानगरपालिकेने आपआपल्या मालमत्ता कराचे वसुलीचे प्रमाण हे वाढवाव. आता आपल्या या शहरातील सर्वे हा आपण पुर्ण केलेला आहे. त्याप्रमाणे याच पुर्नमुल्य निर्धारणाचे काम हे या महिन्यामध्ये पुर्ण झालेले आहे आणि येणाऱ्या काळामध्ये आता जस आपण नियोजन करतोय त्यानुसार पुढील वर्षामध्ये आपल्या वसुलीच प्रमाण हे आपल्याला अधिक वाढवाव लागणार आहे. त्याचप्रमाणे आपण हुडको कर्जमाफी घेत असतांना राज्य शासनाने जे आपल्याला एकरकमी १२५ कोटी रूपयांच अनुदान हे आगाऊ आपल्याला दिलेले होते आणि जे आपण राज्य शासनाकडे १२५ कोटींमध्ये जमा करून आपण भरले व आपल्यावर असलेले हुडकोच कर्ज हे समाप्त  झाल आणि राज्य शासन दरमहिन्याला आपल्याला मिळणाऱ्या जिएसटीच्या अनुदानातुन ३ कोटी रूपये दरमहिन्याला कपात करून घेते. आत्तापर्यंतचा रेषो विचारात घेता पुढील आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत ही दरमहा होणारी ३ कोटींची कपात ही पुर्ण परतफेड झाल्यावर थांबणार आहे. त्यामुळे सन २०२३-२४ या वर्षी हे वाढीव अनुदान हे महानगरपालिकेला आपल्याला आपल्या दैनंदिन कामकाजासाठी उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे गाळेधारकांच्या बाबतीमध्ये मी आता मागच्या राज्य शासनाच्या नियमाचे याच्यात उल्लेख केलेला आहे. त्या २०१९ च्या नियमाप्रमाणे सर्व गाळेधारकांचे मुदत संपलेल्या गाळयांचे नुतनीकरण व हस्तातरणाची प्रक्रीया पुर्ण करा आणि त्याच्यामध्ये या नियमाप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करून त्याची वसुली करावी . आपण आता म्हंटल्याप्रमाणे ही पुर्ण कार्यवाही महानगरपालिकेकडुन पुर्ण झालेली आहे. आता याच्यामध्ये काही तांत्रिक कारण असल्याने आपण राज्य शासनाकडुन आदेश प्राप्त करून घेवु . ही थकबाकीची रक्कम वसुल करण्याच्या कालावधी मधील बाबतीत येणाऱ्या काळामध्ये प्रयत्न करणार आहे. या सगळयांचा विचार करता. आपण येणाऱ्या आर्थिक वर्षाच्या सुरूवातीपासुन म्हणजे एप्रिल २०२२ पासुन महानगरपालिकेच्या सर्व कायम कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय आपण घेत आहोत. त्या प्रमाणे १ एप्रिल पासुन महानगरपालिकेच्या सेवेमध्ये कायम असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या धर्तीवर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेण्या देण्यात येतील. याप्रमाणे पुर्नरचना करण्याच काम हे महानगरपालिकेचा सामन्य

प्रशासन विभाग आणि लेखा विभाग यांच्यामार्फत हाती घेण्यात येईल आणि हे काम लवकरात लवकर पुर्ण करण्यात येईल. महानगरपालिकेचे जे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत त्यांनाही एप्रिल २०२२ पासुन मिळणारे निवृत्तीवेतन हे ७ वा वेतन आयोगाच्या धर्तीप्रमाणे निश्चित करून नविन निवृत्ती वेतन लागू करण्याचा निर्णय हा प्रशासनाकडुन घेण्यात येत आहे आणि याप्रमाणे सर्व सेवानिवृत्ती वेतन धारकांना एप्रिल २०२२ पासुन नविन सेवानिवृत्ती वेतन या प्रमाणे देण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या शाळेंमध्ये जे शिक्षक आहेत व शिक्षकेतर कर्मचारी आहेत. त्यांना २०१८ मध्ये राज्य शासनाने एक विशेष निर्णय राखुन या सर्व महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या सर्व प्राथमिक शिक्षकांना हा ७ वा वेतन लागू केला होता. परंतू आपल्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेवुन आपण गेल्या ४ वर्षांपासुन या शिक्षकांना आपल्या याच्यातील जी ७ व्या वेतन आयोगाची जी रक्कम आहे ती आपण देवु शकत नव्हतो . याबाबतीत सुध्दा शिक्षकांकडुन, सन्मा. पदाधिकाऱ्यांकडुन सतत पाठपुरावा केला होता. याला प्रतिसाद म्हणुन आपण जानेवारी महिन्यामध्ये महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील सर्व शिक्षकांना ७ वा वेतन आयोगाच्या धर्तीवर लागू करण्याकरीता मान्यता दिलेली आहे आणि या प्रमाणे फेब्रुवारी महिन्याच्या पगारापासुन महानगरपालिकेच्या हिश्यांची रक्कम सुध्दा आपण सुधारीत वेतन श्रेणीनुसार वाढीव पध्दतीने कर्मचाऱ्यांना वेतन आपण देत आहोत म्हणजे येणाऱ्या एप्रिल पासुन जर आपण विचार केला तर महानगरपालिकेचे कार्यरत असलेले सर्व सेवक , सेवानिवृत्त सेवक आणि महानगरपालिकेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सुध्दा राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर आपण ७ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी आपण लागू करत आहोत आणि याचा येणारा भार आपल्यावर येणार आहे. साधारणपणे आत्ताच्या येणाऱ्या वेतनाप्रमाणे २५ टक्क्यांची वाढ ही येणाऱ्या पुढच्या आर्थिक वर्षामध्ये अपेक्षित आहे. त्यासाठी वाढीव आस्थापना खर्चाची तरतूद ही महानगरपालिकेच्या पुढील आर्थिक वर्षामध्ये आपण केलेली आहे. आता हे करत असतांना कायमस्वरूपी महानगरपालिकेचा आस्थापनावरील असलेला ३५ टक्क्यांवरचा खर्च व या दृष्टीने आपण नविन कर्मचारी भरत असतांना व त्याच्यावर येणारी बंधने आणि महानगरपालिकेची उत्पन्नाची वाढ या दोन्ही गोष्टींचा ताळमेळ करून आपल्याला आस्थापना खर्चाची मर्यादा या पुढच्या काळामध्ये राज्य शासनाने लागू केलेल्या अंतिम मर्यादेच्या आधारे त्यादृष्टीने आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत. राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ पासुन हा वेतन आयोग लागू केलेला आहे. अशा परिस्थिती मध्ये आपण एप्रिल २०२२ पासुन लागू करत आहोत म्हणजे साधारणत: मागच्या ६ वर्षांमधील ही जी थकबाकी आहे ही थकबाकी निश्चित किती आहे. हे प्रत्येक कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती झाल्यानंतर लेखा विभागामार्फत मागील ६ वर्षांची जी काही वेतनाची बाकी आहे. त्याचा आकडा निश्चित करून आणि ती वेतनाची थकबाकी देण्याच्या संदर्भामध्ये राज्य शासन ७ वा वेतन आयोग मंजुर करीत असतांना हि थकबाकी द्यायची किंवा नाही द्यायची किंवा ती द्याची तर किती टप्प्यांमध्ये द्यायची याबाबतीमधील धोरण ठरविण्यासाठी मा.महासभेसमोर मान्यतेसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल. अर्थात राज्य शासनाने याच्यामध्ये बंधन घातलेले आहे की अशा प्रकारची थकबाकी देण्याचा निर्णय जर महानगरपालिकेने घेतला तर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ५ हप्त्यांमध्ये ही रक्कमांची थकबाकी द्यायचा निर्णय घेतला आहे. त्याच प्रमाणे महानगरपालिकेने स्वत: निर्णय घ्यावा असे बंधने आपल्यावर आणण्यात आलेले आहे. याबद्दलचा विचार करून एकत्रित थकबाकी किंवा वेतनाची बाकी देणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव हा मा.महासभेसमोर सादर करण्यात येईल. सर्व सविस्तर आपण सा संदर्भामध्ये निर्णय आपण घेतलेला आहे. मला वाटते काही तपशिलवार बाबी आवश्यक आहेत म्हणुन जाणीपुर्वक सभागृहामध्ये सर्व सन्मा.सदस्यांच्या समोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता या सर्व मांडलेल्या अर्थसंकल्पाचा समारोप करण्यापुर्वी सर्वांचे आभार मानने हे ही आवश्यक आहे. या दृष्टीने आदरणिय भारताचे मा.पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, सर्वांसाठी घरे आणि अन्य योजनांच्या माध्यमातुन जळगांव शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी जे योगदान दिले आहे. त्याबद्दल त्यांचे व केंद्र शासन यांचे कृतज्ञापुर्वक आभार व्यक्त करतो.

महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, आदरणिय नगरविकास मंत्री ,जळगांव जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, तसेच मा.खासदार व मा.विधानसभा तसेच विधानपरिषदेवरील सदस्य, सन्मा.आमदार यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो.जळगांव शहर महानगरपालिकेच्या माध्यमातुन जळगांव शहरातील नागरिकांच्या अडीअडचणी दुर करुन त्यांना जास्तीत जास्त चांगल्या दर्जाच्या सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या निर्णय प्रक्रियेत त्यांनी प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये प्रशासनास वेळोवेळी सहकार्य व बहुमोल मार्गदर्शन

करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय गटनेते, सर्व सन्मा.नगरसेवक यांचे मन:पुर्वक आभार व्यक्त करतो.

जळगांव शहरातील सर्व वृत्तपत्र आणि वृत्तवाहिन्यांचे पत्रकार, प्रतिनिधी यांनी महापालिकेच्या विविध योजनांना, तसेच धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देवुन सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त करतो.

महानगरपालिके समोरील व शहरातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये गुणात्मक तसेच संख्यात्मक वाढ करण्याचे मोठे आवाहन सध्या महानगरपालिकेसमोर आहे. महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले अपुरे मनुष्यबळ तसेच मर्यादीत आर्थिक क्षमता याचा योग्य ताळमेळ घेवुन पुढील वर्षामध्ये शहरातील नागरिकांना अधिक समाधानकारक सेवा देण्याचा प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्याचा संकल्प आहे. यासाठी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचा योग्य विचारविनीमय करुन अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेस समोर सादर करीत आहे.

जयहिंद , जय महाराष्ट्र

**नगरसचिव :-** आजच्या सभेसाठी सन्मा.सदस्या सौ. प्रतिभा चंद्रकांत कापसे यांचा सुध्दा रजेचा अर्ज प्राप्त झालेला आहे. तो मा. पिठासीन अधिकारी महोदय यांनी मंजुर केलेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई सन्मा.सदस्य व सदस्या या सर्वांच्या लक्षात आणुन देतोय की, आम्हाला आता जे आयुक्त साहेबांनी मार्गदर्शन केले त्याच्यामध्ये आकृतीबंधाबाबत साहेबांकडून काही मुद्दे सांगीतले आहे. ते मुद्दे दिशाभुल करणारे सांगीतलेले आहे.ते मी सभागृहाच्या लक्षात आणुन देतोय . सभागृहाच्या लक्षात मी हे आणुन देतोय शासनाच्या पटलावर आकृतीबंध पेंडींग आहे. त्याच्यामध्ये शासनाकडुन श्री.म. बागवान कक्ष अधिकारी यांचेकडुनपत्र आलेले आहे. मी आकृतीबंधावर काही आक्षेप नोंदविलेले आहेत.त्याचा अहवाल मागविणेसाठी महानगरपालिकेकडुन तो अहवाल आजपर्यंत गेलेला नाही म्हणुन आकृतीबंध आताही पेंडींग आहे.महानगरपालिकेचे आयुक्त साहेबांनी लवकरात लवकर तो अहवाल पाठवला असेल तर मान्यता आहे. त्याच काय होईल हे खरे आहे की खोटे आहे. जे सोक्षमोक्ष होईल शासनासमोर ते झाल्यानंतरच आकृतीबंध मंजुर होणार आहे.तस साहेब बोलले की आकृतीबंध मंजुरीला आहे आणि तुम्ही म्हणता की सर्व जण मिळुन प्रयत्न करा आता पदाधिकारी म्हणुन आपण प्रयत्न काय करणार. अहवाल पाठवा त्या नंतर ते मंजुर होणार आहे आणि सभागृहाला अशी खोटी माहीती देवुन सभागृहाची दिशाभुल करू नका. अशी मी एक विनंती करतो आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई मा.आयुक्त महोदयांनी आता जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे आणि प्रशासनाच्या वतीने त्यांनी विस्तृत पणे त्यांच मनोगत व्यक्त केलेले आहे. आयुक्त महोदय यांच नांव आहे सतिश कुलकर्णी , कुलकर्णी म्हणजे कुल म्हणजे अत्यंत शांत आणि कर्णी म्हणजे केलेले कार्य शांत डोक्याने हे केलेले कार्य

**श्री. सुनिल खडके :-** शांत डोक्याने केले आहे भाऊ कितीही संताप आला आपल्याला तर शांत करून टाकतात साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो म्हणुन त्यांच्या नावाच उत्तेजन केल , कुलकर्णी म्हणजे शांत डोक्याने केलेली कर्णी मा.आयुक्त यांनी आपल्या प्रशासकीय जिवनातील आणि प्रशासकीय कारकीर्दी तील आज शेवटचा अर्थ संकल्प अत्यंत शांत डोक्याने आणि त्यांचा जो काही दोन अडीच वर्षाचा या शहरातील कार्यकाळ असेल. त्यादृष्टीकोनातुन बऱ्याचश्या गोष्टींचा समावेश येथे केलेला दिसुन येतोय. परंतू बऱ्याचशा स्थानिक पातळीवरील अडचणी , स्थानिक पातळीवरील जे काही लोकप्रतिनिधींनी घ्यावयाचे निर्णय असतील किंवा उत्पन्नाच्या बाबतीतील असतील . या सर्व बाबींचा योग्य तो विचार करण्याच्या दृष्टीकोनातुन या संपुर्ण सभागृहाच्या सदस्यांना आपल्या सुचना मांडण्याच्या संदर्भात आणि या अर्थसंकल्पावर अभ्यास करण्याच्या

दृष्टीकोनातुन मी आपणांस विनंती करतो की ही सभा जी आहे ही तहकुब करण्यात यावी आणि याचा अभ्यास करून लवकरात लवकर अर्थसंकल्पाला मान्यता देण्याच्या दृष्टीकोनातुन हे सभागृह प्रयत्नशिल राहील एवढी आपणांस विनंती करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब.

**व्यासपिठावर विरोधी पक्षनेते श्री. सुनिल महाजन हे चर्चा करण्यासाठी आले व मा.महापौर सो व आयुक्त सो यांचेशी चर्चा केली.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटत की येणाऱ्या ३१ तारखेला आपण महासभेचे आयोजन करण्यात याव आणि ३१ तारखेपुर्वी संपुर्ण सभागृहातील सदस्य या अर्थसंकल्पावर विचार करून योग्य तो अर्थसंकल्प आपल्या वतीने या सभागृहासमोर सादर करेल आणि याला मान्यता देण्यात येईल.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेबांनी विस्तृत असा अर्थसंकल्प सन २०२१-२२ चा आपल्या सर्व सभागृहाला अवलोकन करून दिलेले आहे आणि या संदर्भातील कॉप्या आपल्या सर्वांपर्यंत पोहोचलेल्या आहेत.आपल्याला याचा अभ्यास व्हावा यासाठी आपण सदर सभा ३१ मार्च सकाळी ११ वाजेपर्यंत सन्मा. सदस्य यांचे सुचनेनुसार ३१ मार्च सकाळी ११ वाजेपर्यंत तहकुब करीत आहोत.

**व्यासपिठावर सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र पाटील (घुगे) व सन्मा.सदस्या ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह हे मा.महापौर सो व आयुक्त सो यांचेशी चर्चा करीत होते.**

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता आपल्या शहरातील जे विकास कामे आहेत त्याला मान्यता असल्याचे दर्शविलेले आहे. त्या संदर्भात आम्ही सर्व सन्मा.नगरसेवकांचे म्हणजे सर्वांच एकत्र पत्र दिलेले आहे. यात सर्वांच एकत्र पत्र दिलेल आहे आणि वैयक्तीक ही दिलेले आहे. आपण याची दखल घ्यावी.

**ॲड .शुचिता हाडा :-** आमच्या सर्व सदस्यांच एकत्रित पत्र आम्ही देत आहोत.

**मा.महापौर :-** आपण पुढील महासभेलासभेला सुरूवात करू मग पुढील सभेत चर्चा करू.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/११४२/२०२२ दि.०८/०३/२०२२ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण व निवेदन महासभेपूढे सादर करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबींवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी सदर सभा दि.३१/०३/२०२२ रोजी सकाळी- ११.०० वाजेपर्यंत तहकुब करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

येणेप्रमाणे विशेष अर्थसंकल्पीय सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(जयश्री सुनिल महाजन)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**